17 OCT 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्थानिक पदार्थांच्या मार्केटिंगसाठी तंत्रज्ञान आवश्यक : गिरीष चितळे

## विद्यापीठ तंत्रज्ञान विभागातर्फे फूड प्रोसेसिंग कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्थानिक पदार्थांचे जागतिक पातळीवर मार्केटिंग करण्यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधन करावे, असे प्रतिपादन चितळे डेअरीचे कार्यकारी संचालक गिरीष चितळे यांनी केले.



**कोल्हापूर : विद्यापीठात अन्नप्रक्रिया उद्योगात व्यवसायाच्या संधी या विषयावरील विशेष चर्चासत्रात बोलताना गिरीश चितळे. डॉ. जय बागी, योगेश कुलकणी, पल्लवी कोरगावकर, डॉ. ए.के.साहू. (छाया : पप्पू अत्तार)**

'वर्ल्ड फूड डे'च्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग व सीआयआय यांच्या संयुक्त विद्यमाने 'अन्न प्रक्रिया उद्योगात व्यवसायाच्या संधी' या विषयावरील विशेष चर्चासत्रात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सीआयआयच्या दक्षिण महाराष्ट्र झोनचे अध्यक्ष योगेश कुलकर्णी होते. चितळे म्हणाले, देशामध्ये आज बारा ते पंधरा टक्के वाटा हा अन्न प्रक्रिया उद्योगाचा आहे. यामुळे या क्षेत्रामध्ये तरुणांना अनेक प्रकारच्या संधी निर्माण झाल्या आहेत. संशोधक विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा उपयोग करून मालाच्या किमती कमी करणे व गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये विविध प्रकारच्या स्वयंचलित उपकरणांची प्रचंड गरज आहे. कडधान्य, पालेभाज्या, फळे हे देशातील लोकसंख्येला पुरत नाहीत. बऱ्याच ठिकाणी ते पोहोचत नाहीत, खरेदी करता येत नाहीत. त्यामुळे प्रक्रिया उद्योग पुढे येत आहेत. शेतकऱ्यांचे उत्पादन, त्यावरील प्रक्रिया आणि मार्केटिंग यांचा योग्य ताळमेळ जमल्यास तरुणांना प्रचंड उभारी मिळेल.युवा संशोधकांना लोकांच्या बदलत्या गरजांमध्ये संधी शोधता आली पाहिजे. त्याचबरोबर फूड सेफ्टीमध्ये स्वच्छताविषयक जागृती वाढविणे हे जागतिक पातळीवर टिकण्यासाठी गरजेचे आहे. पल्लवी कोरगावकर यांनी कार्यक्रम आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ.जे.एस. बागी, डॉ.ए.के. साहू, प्रताप नाईक, उपकुलसचिव डॉ. जी.एस. कुलकर्णी आदी उपस्थित होते.

17 OCT 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग व सीआयआय यांच्या संयुक्त विद्यमाने 'वर्ल्ड फूड डे'च्या निमित्ताने 'अन्न प्रक्रिया उद्योगात व्यवसायाची संधी' विषयावर बोलताना गिरीश चितळे.**

# जागतिक मार्केटिंगसाठी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रयत्नांची आवश्यकता

## गिरीश चितळे : विद्यापीठात 'अन्न प्रक्रिया उद्योगात व्यवसायाची संधी' विषयावर चर्चासत्र

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

तंत्रज्ञानाच्या साहाय्याने स्थानिक पदार्थांचे जागतिक पातळीवर मार्केटिंग करण्यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधनात्मक प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन चितळे डेअरीचे कार्यकारी संचालक गिरीश चितळे यांनी केले. 'वर्ल्ड फूड डे'च्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग व सीआयआय यांच्या संयुक्त विद्यमाने 'अन्न प्रक्रिया उद्योगात व्यवसायाची संधी' या विषयावर विशेष चर्चासत्र झाले. या चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून चितळे बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीआयआयच्या दक्षिण महाराष्ट्र झोनचे अध्यक्ष योगेश कुलकर्णी होते.

चितळे म्हणाले, देशामध्ये बारा ते पंधरा टक्के वाटा हा अन्न प्रक्रिया उद्योगाचा आहे. यामुळे या क्षेत्रामध्ये तरुणांना अनेक प्रकारच्या संधी निर्माण झालेल्या आहेत. संशोधक विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा उपयोग करून मालाच्या किमती कमी करणे व गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत राहण्याची आवश्यकता आहे. अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये विविध प्रकारच्या स्वयंचलित उपकरणांची प्रचंड निकड आहे. कडधान्ये, पालेभाज्या, फळे हे आपल्याच देशातील लोकसंख्येला पुरत नाहीत. बऱ्याच ठिकाणी ते पोहोचत नाहीत किंवा खरेदी करता येत नाहीत. त्यासाठी प्रक्रिया उद्योग पुढे येत आहेत. शेतकऱ्यांचे उत्पादन, त्यावरील प्रक्रिया आणि मार्केटिंग यांचा योग्य ताळमेळ जमल्यास या क्षेत्रामधील तरुणांना उभारी मिळेल.

आजचा शेतकरी स्वयंपूर्ण नाही. त्याला इतरांवर अवलंबून राहावे लागते. पूर्वी सत्तर ते ऐंशी टक्के इतक्या प्रमाणात वेगवेगळ्या प्रकारचे धान्य शेतकरी स्वतः पिकवत असे. आज तसे होताना दिसत नाही. देशातील लोकांच्या खाण्याच्या गरजा बदलत नाहीत, पद्धती बदलत आहेत. मोठी झेप घेण्यासाठी छोट्या-छोट्या गोष्टींमधील गॅप पाहायला हवा आणि त्यातच संधी निर्माण करता आली पाहिजे. मालाची गुणवत्ता टिकवणे, साठवणूक आणि वाहतूक करणे यामध्ये प्रचंड संधी निर्माण झालेली आहे. विद्यापीठ आणि उद्योग यांच्या समन्वयाने विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध होऊ शकते, असेही चितळे म्हणाले.

पल्लवी कोरगावकर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील हेतू सांगितला. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, डॉ. ए. के. साहू, प्रताप नाईक, उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी आणि तंत्रज्ञान अधिविभागातील संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'यशवंतरावांचे राजकारण नीतीमूल्यांच्या पायावर'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांनी सार्वजनिक जीवनात वावरत असताना स्त्रियांची प्रतिष्ठा जपण्यास नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले. संस्कृती व नीतीमूल्यांच्या भक्कम पायावर त्यांचे राजकारण उभे होते,' असे प्रतिपादन माजी खासदार प्रतापराव भोसले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, यशवंतराव चव्हाण अध्यासन व गांधी अभ्याय केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'यशवंतराव चव्हाण: व्यक्ती, कार्य आणि विचार' या विषयावर एक दिवसीय चर्चा व मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.



भोसले म्हणाले, 'यशवंतराव चव्हाण यांनी स्त्रियांची प्रतिष्ठा जपण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले. अगदी वेणूताईंशीही त्यांचे नाते साथीदाराचे होते. राजकीय स्पर्धेत, प्रचारात त्यांनी प्रतिस्पर्धी स्त्री उमेदवारांवर कधीही टीका केली नाही. प्रत्येक मतदारास चव्हाण स्वत: पत्र लिहित. त्यामुळे यशवंतरावांचे लोकांशी प्रेमाचे नाते निर्माण झाले होते. संस्कृती व नीतीमूल्यांच्या भक्कम पायावर त्यांचे राजकारण उभे होते. त्याच बळावर त्यांनी महाराष्ट्राच्या समाजकारणाचा व राजकारणाचा पाया रचला. त्याच भरभक्कम पायावर आजही महाराष्ट्राचे भरणपोषण होत आहे. यशवंतरावांनी महाराष्ट्राची उभारणी करताना सर्वच पातळ्यांवर काम केले. कला, संस्कृती, कृषी, उद्योग आणि अन्य क्षेत्रासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या. ते पट्टीचे वाचक असल्याने प्रचंड ग्रंथसंग्रह होता. अनेक कलांचे ते भोक्ते होते.'

या उपक्रमांतर्गत दिवसभरात यशवंतराव चव्हाण यांच्या पैलूंवर चर्चा व मान्यवरांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये गौतमीपुत्र कांबळे यांनी 'यशवंतराव चव्हाण यांचे सर्वसमावेश धोरण', तर अशोक चौसाळकर यांनी 'राष्ट्रीय राजकारणातील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान' याबद्दल मुलाखत दिली. दुपारच्या सत्रात किशोर बेडकिहाळ यांनी 'समाजवादाचे चिंतन' याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी 'यशवंतरावांचे भाषा, साहित्य, संस्कृती व शिक्षण' यामधील योगदान प्रकट केले. वसंत भोसले यांनी 'यशवंतरावांचे सामाजिक व कृषी या क्षेत्रातील योगदान' मुलाखतीद्वारे प्रकट केले.

उमेश गडेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. दत्तात्रय घोलप, चेतन गळगे यांनी मुलाखती घेतल्या. डॉ. भारती पाटील यांनी समारोपाचे भाषण केले. प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश पवार व गांधी अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला.

17 OCT 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण यांच्याकडून स्त्रियांची प्रतिष्ठा जपण्यास सर्वोच्च प्राधान्य

## माजी खा. प्रतापराव भोसले यांचे प्रतिपादन

कोल्हापूर : प्रतिनिधी

ज्येष्ठ नेते माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सार्वजनिक जीवनात वावरताना स्त्रियांची प्रतिष्ठा जपण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले, असे प्रतिपादन माजी खासदार प्रतापराव भोसले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, यशवंतराव चव्हाण अध्यासन व गांधी अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'यशवंतराव चव्हाण: व्यक्ती, कार्य आणि विचार' या विषयावर एक दिवसीय चर्चा व मुलाखती कार्यक्रमप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी यशवंतराव चव्हाण यांच्या विषयीच्या आठवणी जागविताना त्यांच्या नैतिक राजकारणाचा पट उभा केला. उपक्रमांतर्गत दिवसभर यशवंतराव चव्हाण यांच्या पैलूंवर चर्चा व मान्यवरांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

गौतमीपुत्र कांबळे यांनी यशवंतराव चव्हाण यांचे सर्वसमावेशक धोरण व डॉ. अशोक चौसाळकर यांनी राष्ट्रीय राजकारणातील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान याबद्दल मुलाखत दिली. दुपारच्या सत्रात किशोर बेडकिहाळ यांनी समाजवादाचे चिंतन याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले.

डॉ. रणधीर शिंदे यांनी यशवंतरावांची भाषा, साहित्य, संस्कृती व शिक्षण यामधील योगदान प्रकट केले. डॉ. वसंत भोसले यांनी यशवंतरावांचे सामाजिक व कृषी या क्षेत्रांतील योगदान मुलाखतीद्वारे प्रकट केले.

उमेश गडेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. दत्तात्रय घोलप, चेतन गळगे यांनी मुलाखती घेतल्या. प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश पवार व गांधी अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 OCT 2017 पुढारी

# विदेशी चित्रपट प्रदर्शनास प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या वतीने 'दृष्टी' या उपक्रमांतर्गत आयोजित चित्रपट प्रदर्शन कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षकांचा प्रतिसाद लाभला.

विद्यापीठात विविध विभागांत शिकत असलेल्या विद्यार्थी व शिक्षकांसाठी गेल्या काही वर्षांपासून देश-विदेशातील चित्रपट प्रदर्शित केले जातात. त्याच्या माध्यमातून प्रेक्षकांची अभिरुची वाढवणे व त्यांना वैश्विक स्तरावरील वैविध्यपूर्ण संस्कृतींचा परिचय करून देणे हा उपक्रमाचा उद्देश आहे.

यावेळी 'दक्षिणायन' या साहित्य व कला क्षेत्रातील उपक्रमांतर्गत अमोल पालेकर व संध्या गोखले यांनी उपलब्ध करून दिलेले चित्रपट प्रदर्शित करण्यात आले. विदेशी भाषा प्र. विभाग प्रमुख डॉ. मेघा पानसरे, सहयोगी शिक्षिका शीतल कुलकर्णी, प्रियांका माळकर, नितीश घाटगे, जीवन जाधव आदी उपस्थित होते.

लोकमत

कौशल्य विकासाचे पाऊल; इंडो-जर्मन टूलरुम अंतर्गत उपक्रम; बारा अभ्यासक्रम केले सुरु

# शिवाजी विद्यापीठात साकारले आधुनिक तंत्रज्ञान केंद्र

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पश्चिम महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्राला उपयुक्त ठरणारे कौशल्यपूर्ण मनुष्यबळ विकासाचे पाऊल शिवाजी विद्यापीठाने टाकले आहे. इंडो-जर्मन टूल्स रुम अंतर्गत विद्यापीठात ॲडव्हॉन्सड टेक्नॉलॉजी सेंटर साकारले आहे. या केंद्रांतर्गत कमी कालावधीच्या विविध बारा अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे.

विद्यापीठ आणि औरंगाबाद येथील इंडो जर्मन टूल्स रुम (आयजीटीआर) यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. त्यानंतर विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या इमारतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान केंद्राची (एटीसी) सुरुवात केली आहे. या केंद्रांतर्गत विद्यार्थी, विविध कंपन्यांमध्ये कार्यान्वित असलेले अभियंते, कर्मचाऱ्यांना तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्षेत्रातील नवसंशोधन, ज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी विविध बारा अभ्यासक्रम सुरु केले आहे. त्यामध्ये ॲटोकॅड, सॉलिड वर्क, सीएनसी प्रोग्रॅमिंग, रिवीट आर्किटेक्चर, थ्री डीएस मॅक्स, स्काडा, आदींचा समावेश आहे. या 'एटीसी'द्वारे पुस्तकीज्ञानासह प्रात्यक्षिकांद्वारे विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकास साधला जाणार आहे.

## प्रगत संशोधन, नवीन अभ्यासक्रम

देशातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या वाढ आणि विकासाला चालना देण्यासाठी भारत सरकारने इंडो जर्मन टूल्स रुमची स्थापना केली. भारत सरकार,जर्मनीचे संघिय प्रजासत्ताक सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांचा एकत्रित प्रकल्प असलेल्या 'आयजीटीआर'मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची गुणवत्ता साधने, प्रशिक्षित कर्मचारी, मार्गदर्शन केले जाते. या सुविधा शिवाजी विद्यापीठातील उपकेंद्रामध्ये उपलब्ध असणार आहेत. सामंजस्य करार झाल्यामुळे विद्यापीठ आणि आयजीटीआर हे प्रगत संशोधनाची सोय, नवीन पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आणि कौशल्य प्रशिक्षण व विकास याबाबत एकत्रितपणे काम करणार आहेत.



## दिवाळीनंतर अभ्यासक्रमांची सुरुवात

ॲडव्हॉन्सड टेक्नॉलॉजी सेंटर (एटीसी) हे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेला विद्यापीठाचा महत्त्वकांक्षी प्रकल्प असल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले. ते म्हणाले, इंडो-जर्मन टूल्स रुमच्या सहकार्यातून याठिकाणी उद्योगविश्वाला आवश्यक असणारे कौशल्यपूर्ण मनुष्यबळ घडविण्यासाठी अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. याअंतर्गत पहिला टप्प्यात बारा अभ्यासक्रमांसाठी नोंदणीची प्रक्रिया सुरु झाली आहे. दिवाळीनंतर या अभ्यासक्रमांची सुरुवात होईल. कौशल्य विकासासह जे कुशल आहेत, त्यांच्यातील कौशल्य अधिक वाढविण्यासाठी 'एटीसी' उपयुक्त ठरणार आहे. एटीसी हे सर्वांसाठी खुले राहणार आहे.